# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान विभाग)

**जाहिरात क्र. /ज.स./2019** **दि. / /2019**

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध विभागातर्फे सुरु असलेल्या विविध सौंदर्यीकरणाचे कामाकरिता हॉनररी समन्वयक (विना मोबदला/निःशुल्क सेवा) म्हणून नियुक्ती करण्यास्तव एम.एस.सी. बॉटनी पदवी तसेच खाजगी, शासकीय व निमशासकीय विभागाकडे कमतीकमी 20 वर्षाचा उद्याने विकसित करणे, लॅण्डस्केप करणे व वृक्षलागवड करणे इ. नमूद सौंदर्यीकरणाचा कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तींची उद्यान विभागा अंतर्गत समन्वयक या पदावर विना मानधन तत्वावर प्रथतः सहा महिण्याच्या कालावधीकरिता नियुक्ती करावयाची आहे.

त्या करिता पात्र इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 03/01/2020 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (III), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | समन्वयक | 01 | कमाल 65 वर्षे | 1) एम.एस.सी. बॉटनी पदवी तसेच खाजगी शासकीय व निमशासकीय विभागाकडे कमतीकमी 20 वर्षाचा नमूद सौंदर्यीकरणाचा कामाचा अनुभव.<br>2) उद्यान विभागांतर्गत तसेच विविध विभागा अंतर्गत नागपूर शहरात उद्यान विकसित करणे, लॅण्डस्केप करणे, वृक्ष लागवड करणे इ. सौंदर्यीकरणाचे विकासाचा कामाकरिता समन्वयक ठेवण्याकरिता उक्त कामाचा शासकीय व निमशासकीय विभागाकडे कमतीकमी 20 वर्षाचा कामाचा अनुभव असावा.<br>3) उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>4) उमेदवार यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |

वरील उमेदवारांनी दि.03/ 01 /2020 रोजी सकाळी 10:30 ते 12.00 पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणा—या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यांत येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता /अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/—
(अभिजीत बांगर)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. / /2019

अर्हता :—

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त (III), नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

3) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 03 /01 /2020 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

4) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकिंत करून जोडाव्यात.

5) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

6) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

7) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती प्रथमतः 6 महिन्याकरिता राहील.

8) महानगरपालिकेच्या कामांचे पर्यवेक्षण करण्यासाठी संबंधितांना मनपातर्फे वाहन पुरविण्यात येईल. वेगळा वाहन भत्ता मिळणार नाही. तसेच स्वतःच्या खर्चाने मोबाईल नेहमी चालू ठेवावा लागेल.

9) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध सौंदर्यीकरणाची कामे समन्वयक म्हणून पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील

10) समन्वयक व्यक्ती हया विभागामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचे पालन करतील.

11) करार पध्दतीने नेमणूक देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

12) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका—यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

13) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा—या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

14) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

15) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

16) सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आंत समन्वयक म्हणून कामे पाहावी लागतील. निर्धारीत मुदतीत रूजू न झाल्यास, त्यांची नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.

17) नियुक्ती नंतर सेवा सोडून जावयाचे असल्यास, एक महिना अगोदर लेखी सूचना द्यावी लागेल. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कामाची जबाबदारी घेणे बंधनकारक राहील.

(अभिजीत बांगर)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. / /2019

# अर्जाचा नमूना

फोटो

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पदाचे नाव | :– | ................................................................ |
| 2. | अर्जदाराचे नांव | :– | ................................................................ |
| 3. | पूर्ण पत्ता | :– | ................................................................<br>................................................................<br>................................................................ |
| | भ्रमणध्वनी क्रमांक | :– | ................................................................ |
| | ई–मेल आय डी | :– | ................................................................ |
| 4. | जन्म दिनांक | :– | ................................................................ |
| 5. | दि. / /2019 ला वय | :– | ................................................................ |
| 6. | शैक्षणिक पात्रता | :– | ................................................................ |
| 7. | शासकीय, निमशासकीय व खाजगी कामाचा अनुभव प्रमाणपत्र व कालावधी | :– | ................................................................<br>................................................................ |
| 8. | अ) सेवाकाळातील कुठल्याही चौकशी सुरू आहे/होती काय?<br>ब) असल्यास चौकशीत शिक्षा झाली होती का? | | |
| 9. | अनुभव | :– | |

| अ. क्र. | संस्थेचे नाव | कामाचे नाव | कालावधी (पासून – पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**स्वाक्षरी**